# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. विशेष स्थायी समिती सभा दि. २९/०९/२०१८

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा शनिवार दि. २९/९/२०१८ रोजी सभा सुचना क्र. ०९ दि. २८/०९/२०१८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात दुपारी ३.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. धृवकिशोर पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम | मा. सभापती |
| २. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ३. | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ४. | श्री. तिवारी अशोक सुर्यदेव | सदस्य |
| ५. | श्रीम. रावल मेघना दिपक | सदस्या |
| ६. | श्री. विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ७. | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ८. | श्रीम. वंदना मंगेश पाटील | सदस्या |
| ९. | श्रीम. वर्षा गिरधर भानुशाली | सदस्या |
| १०. | श्रीम. दिप्ती भट्ट | सदस्या |
| ११. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| १२. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्या |
| १३. | श्रीम. वंदना विकास पाटील | सदस्या |
| १४. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |
| १५. | श्री. राजीव मेहरा | सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. व्यास रवि वासुदेव | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व सन्मा. सदस्यांचे सभेसाठी हार्दिक स्वागत. माझ्या सभापती पदाला एक वर्ष पूर्ण झाले. सर्व सदस्यांनी ह्या पूर्ण वर्षभरात चांगले सहकार्य केल्याबद्दल सर्वांचे धन्यवाद. ह्यापुढे देखील मला सर्वांचे सहकार्य मिळावे अशी आशा व्यक्त करतो. सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

**जुबेर इनामदार :-**

स्थायी समिती सभापतींचे एक वर्ष पूर्ण झाले. त्यांनी ह्या वर्षभरात चांगले काम केले. सर्व सभेत आम्हाला आमची मत मांडण्यासाठी संधी दिली. त्यांना पुढच्या कार्यासाठी आर्शिवाद.

**अनिता पाटील :-**

२००२ पासून आम्ही एकत्र आहोत. राजकारणात ते सक्रिय असतात. ते धडाडीचे कार्यकर्ते आहेत. त्यांनी नेहमी आमची मते ऐकून घेतली त्याबद्दल धन्यवाद.

**दिप्ती भट :-**

आज आपला लास्ट दिवस आहे. तुम्ही आम्हाला सभेत मत मांडण्याचा अधिकार दिला. सर्व सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्या त्याबद्दल तुमचे आभार.

**मा. सभापती :-**

सर्व सदस्यांचे धन्यवाद. सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १०८, **मनपा क्षेत्रातील रस्ते, गटार, पदपथ, बाजार परिसरातील दैनंदिन साफसफाई करणे, दैनंदिन घरोघरी जाऊन ओला व सुका कचरा स्वतंत्र गोळा करुन घनकचरा व्यवस्थापन कामी प्राप्त निविदा स्विकारणेस मंजूरी देणेबाबत.**

हसमुख गेहलोत :-

**प्रशासनाने सादर केलेल्या गोषवारानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते , गटार, पदपथ, बाजार परिसरातील दैनंदिन साफसफाई करणे, दैनंदिन घरोघरी जाऊन ओला व सुका कचरा स्वतंत्र गोळा करून घनकचरा व्यवस्थापन कामाच्या 04 वर्षाकरिता दि. 21/09/2018 पर्यंत ई-टेंडरिंगद्वारे ऑनलाईन पध्दती ने निविदा मागविण्यात आल्या होत्या.**

**प्राप्त निविदाकार मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा . लि. यांनी सादर केलेले दर जादा असल्याने सदरचे दर कमी करणे संदर्भात मा. आयुक्त यांच्या समक्ष निविदा निवड समिती व निविदाकार समवेत दरात वाटाघाटी करून खालीलप्रमाणे दर सादर केले आहेत.**

**Part - I**

| Sr. No. | Description of Item | Type of Vehicles Required | मंजूर दर |
|---|---|---|---|
| 1 | Door to door collection of Wet and Dry waste separately on daily basis from the waste generators in 03 and 07 tones capacity vehicles. Daily collection and transportation MSW as per MSW rules 2016 from city to plant site of the Corporation. | Compactor (New)<br>(7 ton Capacity close body with four labour ) | **Rs.14,500/- Per Day (Per Shift)** |
| | | Mini Tipper (New)<br>(Mini Tipper 3 Ton capacity close body with four labour ) | **Rs.11,000/- Per Day (Per Shift)** |
| 3 | JCB Machine | Rate Per Hours | **Rs.990/- Per Hrs.** |

**Part - II**

| Sr. No. | Description of Item | Type of Required | मंजूर दर |
|---|---|---|---|
| 1 | Daily sweeping, cleaning of road, footpaths and public places by manually. Cleaning of gutters twice in a month, collect silt from drain and transport it at plant site | Manpower per day (Inclusive of minimum wages, safety measures, uniform, equipment & administrative charges etc.) | **Rs.955/- Per Day Per labour(Per Shift)** |

**निविदाकाराने प्रती दिन प्रती मजूर रू .1200/- दर सादर केले होते . मात्र दर वाटाघाटी दरम्यान मा . आयुक्त व निविदा निवड समिती यांच्यात समक्ष झालेल्या चर्चेत केंद्रशासनाच्या नियमाप्रमाणे ग्रॅज्युटी मुद्दा भविष्यात लागु झाल्यास ती मनपा.तर्फे देण्यात येईल. त्याअनुषंगाने निविदाकारानी रू.955/- प्रती मजूर प्रती दिन (Per Shift) याप्रमाणे दरास संमती दिली . निविदा अटीशर्तीमध्ये नमुद केलेल्याप्रमाणे आठ तास (एक शिफ्ट) मध्ये घनकचरा वाहतुक करण्यासाठी उपरोक्त वाहने उपलब्ध करावी . तसेच महापालिकेस आठ तासापेक्षा जादा वेळेकरीता वाहने व मजूरां मार्फत कामे करून घेतल्यास मंजूर दरानुसार देय अनुज्ञेय राहील**

**किमान वेतन दर व इतर देय भत्ते यामध्ये शासनाकडून वेळोवेळी होणा -या सुधारणेप्रमाणे रक्कम लागु करून मनपा .कडून अदा करण्यात यावी . मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्याप्रमाणावर नागरीकरण होत असून सदर परिसरातील नियोजित रस्ते, गटारे, बाजार परिसरात वाढ होत असल्याने दैनंदिन साफसफाई व घनकचरा व्यवस्थापन कामाची व्याप्तीनुसार आवश्यकतेप्रमाणे वाहने व मजूरांच्या संख्येत वाढ करणेबाबतचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत.**

**तरी वरीलप्रमाणे वाहने व मनुष्यबळ पुरवठा कामी मे . ग्लोबल वेस्ट मॅनजमेंट सेल प्रा .लि. या निविदाकाराने निविदेमध्ये सादर केलेल्या दरात वाटाघाटी करुन प्राप्त झालेल्या दरास हि सभा मंजूरी देत आहे.**

**अशोक तिवारी :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय गोषवा-यामध्ये प्रशासनाने समिती गठीत केली होती. समितीने काय निर्णय घेतले त्याचा कुठेही उल्लेख नाही. किती वाहने लागणार, किती कर्मचारी घेणार? प्रभाग निहाय आम्ही त्याच्यामध्ये चर्चा केली होती. प्रभाग निहाय किती कर्मचारी असणार, किती गाड्या मीनी किंवा मोठ्या गाड्या किती असणार त्याचा कुठेही उल्लेख नाही. हे गोपनिय ठेवण्याचे कारण काय? किती वर्षांसाठी हा ठेका देता. त्याचाही कुठे उल्लेख नाही. तुम्ही गाड्यांचे दर मंजूर करुन घेता.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो मा. महासभेने चार वर्षांसाठी आर्थिक प्रशासकीय मंजूरी दिली होती. त्यानंतर गटनेत्यांची बैठक झाली. त्यामध्ये ९० करोडचे बजेट होते. त्यानुसार आपल्याकडे किती माणसे बसू शकतात तेवढीच १५९९ जेवढे अस्तित्वात कर्मचारी आहेत तेवढेच ठेवायचे ठरले आणि ११० गाड्या असा ठराव झाला आहे. प्रशासनाची मंजूरी झाली आहे. महासभेने चार वर्षांसाठी टेंडर काढले आहे. चार वर्षाच्या टेंडरसाठी निविदा प्रसिध्द केलेली आहे. त्यानुसार ते वार्षिक दर मंजूर करुन घेतो. सदरचे टेंडर चार वर्षांचे असणार आहे. त्याची ग्रॅच्यूएटी अपॉईंट करण्यासाठी चार वर्षांचे टेंडर काढले आहे. जर भविष्यात काही उपलब्ध झाले तर मुद्दा आपण महापालिका बेअर करणार आहे. त्यामुळे महासभेची चार वर्षांची आर्थिक प्रशासकीय मंजूरी घेतली आहे. त्या संदर्भात आपली बैठक झाली. सविस्तर चर्चा झाली. आपल्याला २१०० कर्मचारी लागत होते आपले बजेट कमी होते. जेवढे शक्य आहे सध्याची एक्झीस्टींग जेवढी माणस आहेत त्यातूनच काम करु आणि भविष्यात तरतुद उपलब्ध झाली तर आपण रेट मंजूर करुन घेतलेले आहेत ते अधिकार आयुक्तांना दिले आहेत. काही ठिकाणी मनुष्याची किंवा वाहनांची गरज असेल तर आयुक्तांना अधिकार देऊन ती संख्या वाढवणार आणि बजेट जर कमी असेल तर पुर्नःविनियोजन करुन ते उपलब्ध करुन घेणार.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त प्रश्न थोडक्यात होता आपली निविदा प्रक्रिया आपला ठराव करताना प्रशासनाने गोषवारा देताना चार वर्षांसाठी केला त्याचा उल्लेख का केला नाही.

**मा. सभापती :-**

तिस-या नंबरमध्ये प्रशासनाने सादर केलेल्या गोषवा-यानुसार मिरा भाईंदर महापालिकेतील रस्ते, गटार, बाजार, परिसरातील दैनंदिन साफसफाई, घरोघरी जाऊन ओला व सुका कचरा गोळा करुन घनकच-याच्या चार वर्षांकरिता निविदा पण चार वर्षांच्या मागवल्या. वर्षाकरिता दि. २१/०९/२०१८ पर्यंत ई-टेंडरींगद्वारे ऑनलाईन पध्दतीने निविदा मागवण्यात आल्या होत्या.

**जुबेर इनामदार :-**

समिती गठीत झाली. समितीमध्ये सर्व सदस्य नसतात. गोषवा-यामध्ये तसे नमूद कोष्टक आपण तयार केले होते. प्रभाग समितीप्रमाणे किती गाड्या असतील किती मनुष्यबळ असेल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

१९०० कर्मचारी लागत होते तेव्हा आपले ठरले की तर एवढी तरतुद शिल्लक आहे. सध्या जेवढे मनुष्यबळ आहे जेवढी व्हेईकल्स आहेत त्या पध्दतीने करायचे ठरले. भविष्यात तरतुद उपलब्ध करुन दिली तर संख्या वाढवू. आपण रेट्स मंजूर करणार आहोत. आवश्यकतेनुसार मंजूर पुरवठा आणि वाहन करणार आहोत.

**तारा घरत :-**

मा. सभापती महोदय किती माणसे आणि किती भावाने दिवसाच्या पगारावर ते आम्हाला लेखी द्या.

**मा. सभापती :-**

गोषवा-यामध्ये आहे. मागच्या वर्षापेक्षा ह्यावर्षी आम्ही कमी रेटनी दिले आहे.

**अनिता पाटील :-**

त्याच्यात माझा एक असा विषय होता. जे मजूर घेणार आहेत त्याची हजेरी बायोमॅट्रीक करण्यात यावी.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ह्यावेळी कसे केले आहे स्वतः महापालिका डेव्हलप करणार आहे. ह्याच्यापूर्वी दुसऱ्यांकडे सॉफ्टवेअर दिले होते. मध्यंतरी प्रॉब्लेम आला. एक ते दीड महिना बंद होते. महापालिका स्वतः करणार आहे. बायोमॅट्रीक अटेंडंस जी.पी.एस सिस्टम हे महापालिका स्वतः करणार आहे.

**वर्षा भानुशाली :-**

मी तुम्हाला ३-९ ला एक पत्र दिले होते. ते पत्र तुम्ही माझ्या समोरच कांबळेला दिले. त्यांनी ते फाईलमध्ये असेच ठेवले. ३ तारीख दिलेले पत्र आज २९ डेट आहे. म्हणजे आमचे पत्र नुसते रद्दी आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मॅडम पत्राला उत्तर द्यायला सांगतो.

**वर्षा भानुशाली :-**

माझ्या वॉर्डमध्ये मी बऱ्याच टाईमापासून तक्रार करते. साहेबांकडे ३-४ वेळा जाऊन बसली. आमचे भांडणसुध्दा झाले. कांबळे साहेब माझ्या वॉर्डमध्ये फिरुन आले नंतर काय दुसऱ्या दिवशी तेच. माझ्या वॉर्डमध्ये मनुष्यबळ कमी आहे असे मी सांगत नाही जेवढे आहे तेवढे ते काम पूर्ण करतात. मला मनुष्यबळाची गरज नाही. पण काम नीट करत नाही. आणि बिल्डींगमधून पण पैसे मागतात. त्याच्यासाठी मी पत्र टाकले होते की बायोमॅट्रीक पध्दतीने जी हजेरी लावतो त्याचे मला रिपोर्टींग करा. मशीन खराब असेल तर ते आन्सर द्या. ते पण दिले नाही नंतर जी.पी.एस. सिस्टम विक्रमकुमार असताना २ कोटीचा मिरा भाईंदर स्वच्छ अभियानासाठी खर्च केला. आम्ही पत्र टाकायचे नाही का?

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. १०८ :-**

**मनपा क्षेत्रातील रस्ते , गटार, पदपथ, बाजार परिसरातील दैनंदिन साफसफाई करणे , दैनंदिन घरोघरी जाऊन ओला व सुका कचरा स्वतंत्र गोळा करुन घनकचरा व्यवस्थापन कामी प्राप्त निविदा स्विकारणेस मंजूरी देणेबाबत.**

**ठराव क्र. ९० :-**

**प्रशासनाने सादर केलेल्या गोषवारानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते , गटार, पदपथ, बाजार परिसरातील दैनंदिन साफसफाई करणे, दैनंदिन घरोघरी जाऊन ओला व सुका कचरा स्वतंत्र गोळा करून घनकचरा व्यवस्थापन कामाच्या 04 वर्षाकरिता दि. 21/09/2018 पर्यंत ई-टेंडरिंगद्वारे ऑनलाईन पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या होत्या.**

**प्राप्त निविदाकार मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा . लि. यांनी सादर केलेले दर जादा असल्याने सदरचे दर कमी करणे संदर्भात मा. आयुक्त यांच्या समक्ष निविदा निवड समिती व निविदाकार समवेत दरात वाटाघाटी करून खालीलप्रमाणे दर सादर केले आहेत.**

**<u>Part - I</u>**

| Sr. No. | Description of Item | Type of Vehicles Required | मंजूर दर |
|---|---|---|---|
| 1 | Door to door collection of Wet and Dry waste separately on daily basis from the waste generators in 03 and 07 tones capacity vehicles. Daily collection and transportation MSW as per MSW rules 2016 from city to plant site of the Corporation. | Compactor (New)<br>(7 ton Capacity close body with four labour ) | **Rs.14,500/- Per Day (Per Shift)** |
| | | Mini Tipper (New)<br>(Mini Tipper 3 Ton capacity close body with four labour ) | **Rs.11,000/- Per Day (Per Shift)** |
| 3 | JCB Machine | Rate Per Hours | **Rs.990/- Per Hrs.** |

**Part - II**

| Sr. No. | Description of Item | Type of Required | मंजूर दर |
|---|---|---|---|
| 1 | Daily sweeping, cleaning of road, footpaths and public places by manually. Cleaning of gutters twice in a month, collect silt from drain and transport it at plant site | Manpower per day (Inclusive of minimum wages, safety measures, uniform, equipment & administrative charges etc.) | **Rs.955/- Per Day Per labour(Per Shift)** |

**निविदाकाराने प्रती दिन प्रती मजूर रू.1200/- दर सादर केले होते. मात्र दर वाटाघाटी दरम्यान मा. आयुक्त व निविदा निवड समिती यांच्यात समक्ष झालेल्या चर्चेत केंद्रशासनाच्या नियमाप्रमाणे ग्रॅज्युटी मुद्दा भविष्यात लागु झाल्यास ती मनपा.तर्फे देण्यात येईल. त्याअनुषंगाने निविदाकारानी रू.955/- प्रती मजूर प्रती दिन (Per Shift) याप्रमाणे दरास संमती दिली. निविदा अटीशर्तीमध्ये नमुद केलेल्याप्रमाणे आठ तास (एक शिफ्ट) मध्ये घनकचरा वाहतुक करण्यासाठी उपरोक्त वाहने उपलब्ध करावी . तसेच महापालिकेस आठ तासापेक्षा जादा वेळेकरीता वाहने व मजूरां मार्फत कामे करून घेतल्यास मंजूर दरानुसार देय अनुज्ञेय राहील.**

**किमान वेतन दर व इतर देय भत्ते यामध्ये शासनाकडून वेळोवेळी होणा -या सुधारणेप्रमाणे रक्कम लागु करून मनपा .कडून अदा करण्यात यावी . मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्याप्रमाणावर नागरीकरण होत असून सदर परिसरातील नियोजित रस्ते, गटारे, बाजार परिसरात वाढ होत असल्याने दैनंदिन साफसफाई व घनकचरा व्यवस्थापन कामाची व्याप्तीनुसार आवश्यकतेप्रमाणे वाहने व मजूरांच्या संख्येत वाढ करणेबाबतचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत.**

**तरी वरीलप्रमाणे वाहने व म नुष्यबळ पुरवठा कामी मे . ग्लोबल वेस्ट मॅनजमेंट सेल प्रा .लि. या निविदाकाराने निविदेमध्ये सादर केलेल्या दरात वाटाघाटी करून प्राप्त झालेल्या दरास हि सभा मंजूरी देत आहे.**

**सुचक :- श्री. हसमुख गेहलोत      अनुमोदन :- श्री. अशोक तिवारी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

कांबळे साहेब सदस्यांनी ह्यापूढे पत्र दिले तर त्याच्यावर ॲक्शन घ्यायची पुन्हा तक्रार आली नाही पाहिजे. मिटींग संपली असे मी जाहिर करतो.

(सभा संपण्याची वेळ दु. ३.५० वाजता)

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)

नगरसचिव

मिरा भाईंदर महानगरपालिका